# महाराष्ट्र शासन

सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१

Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

---

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, २६६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२


जा.क्र.ससं/उशि/पुवि/कॅस प्रकरणे/२०२२/320 दिनांक १०.२.२०२२.

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ७.
२. संचालक / कुलसचिव डेक्कन कॉलेज व पदव्युत्तर संस्था, येरवडा, पुणे – ६
३. संचालक / कुलसचिव, गोखले इन्स्टिटयुट ऑफ पॉलिटिक्स, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य,विज्ञान,
विधी, शारीरिक शिक्षण व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे.**

विषय - **अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अध्यापकांच्या करिअर ॲडव्हॉन्समेंट स्कीम अंतर्गत (कॅस) प्रलंबित प्रकरणांबाबत..**

संदर्भ - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा. पुणे यांचे परिपत्रक क्र. युएनआय/२०२२/परिपत्रक/ कॅस/विशि-१/११८३ दिनांक ८.२.२०२२

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, पुणे विभागातील विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील अध्यापकांचे करिअर ॲडव्हॉन्समेंट योजनंतर्गत (कॅस) पदोन्नतीची प्रकरणे दीर्घकाळ विद्यापीठे व महाविद्यालयाच्या स्तरावर प्रलंबित असल्याचे दिसून येते. अशा स्वरुपाच्या तक्रारी राज्य स्तरावर विविध शिक्षक संघटनांकडून प्राप्त होत आहेत. शासन शुध्दीपत्रक दिनांक १० मे, २०१९ मधील पदोन्नतीच्या दिनांकाबाबतच्या तरतूदी विचारात घेता अध्यापकांची CAS प्रकरणे वेळेवर निकाली काढणे आवश्यक आहे.

अध्यापकांना सेवांतर्गत प्रगती योजना (कॅस) च्या अर्हता व पात्रता पूर्ण केल्यानंतर छाननी/पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करुन शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे पदोन्नती देणे आवश्यक आहे. याबाबत शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१९/प्रक्र २२८/१९/विशि-१ दिनांक ०८ जुलै, २०१९ अन्वये स्वयंस्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत.

या तरतूदी विचारात घेऊन विद्यापीठ स्तरीय तसेच संस्था व महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे स्तरावर प्रलंबित असलेली सेवांतर्गत प्रगती योजनेचे (CAS) ची प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. किरणकुमार बोंदर)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना माहितीसाठी सविनय सादर.